दै. प्रजावाणी दि. १५/०२/२०२५

## मतिमंद पिडितेवर अत्याचार प्रकरणी

# आरोपीस तीन वर्षाची सक्त मजुरी

**प्रतिनिधी • नांदेड**

जन्मापासून अपंग मूकबधिर व मतिमंद असलेल्या एका मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला येथील न्यायालयाने तीन वर्षे सप्त मजुरी व १५००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सदरची लावण्यात आलेली १५००० रुपये दंडाची रक्कम पिडितेच्या वडिलांना देण्याचे न्यायालयाने आदेशित केले आहे.

माहूर तालुक्यातील कोलामपुरा येथे अपंग असलेल्या मुलीवरील अत्याचाराची घटना ३ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी घडली होती. पिडितेच्या घराशेजारीच असलेल्या कृष्णा मारुती शिंदे याने हे दुष्कृत्य केल्याचे समोर आल्यानंतर आरोपी कृष्णा शिंदे याच्याविरुद्ध पीडीतेच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून माहूर पोलीस स्थानकात कलम ३७६, ३७६ (२) (जे), ३७६ (२) (एल) ४५२ भारतीय दंडविधान अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ए. आर. पवार यांनी करून आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. आरोपी विरुद्धचे दोषारोप पत्र सिद्ध करण्यासाठी सरकार पक्षातर्फे एकूण दहा साक्षीदार तपासले. आरोपी विरुद्ध आलेल्या परिस्थितीजन्य पुरावा सबळ असल्याने दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीशांनी आरोपी कृष्णा मारुती शिंदे याला शिक्षा सुनावली. कलम ४५२, ३५४ भादवी व कलम ९२ अपंग व्यक्तीचे हक्क यानुसार तीन वर्षे सहा महिने सश्रम कारावासाची व पंधरा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. आरोपीला लावलेली दंडाची रक्कम पीडितेच्या वडिलांना देण्याचेही न्यायालयाने आदेशित केले. सरकार पक्षाच्या वतीने जिल्हा सरकारी वकील रणजीत देशमुख यांनी काम पाहिले. पैरवी अधिकारी म्हणून पोहेकॉ मेडपलवार यांनी काम पाहिले. या प्रकरणात आरोपी कृष्णा शिंदे हा विवाहित असून त्याच्या पत्नीने त्याला सोडून दिल्याची माहिती आहे.